# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

## श्री क्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३३०४

(महाराष्ट्र शासन स्थापित)

**रामकृष्णहरी**

जाहीर दरपत्रक – २०२६ – २७

श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांत व व्हिडीओकॉन, भक्तनिवास सर्व परिसर येथील जनरल पेस्ट कंट्रोल व वाळवी फवारणी कामाबाबत

| अ..क्र | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल कामाचा कालावधी | ०१ वर्ष |
| २ | वार्षिक अंदाजे खर्च | ८,००,०००/– |
| ३ | बयाना रक्कम (EMD) | १०,०००/– |
| ४ | टेंडर फॉर्म  फी | २,३६०/– |
| ५ | सुरक्षा ठेव रक्कम | अट क्र. १० नुसार |

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि. सोलापूर – ४१३३०४

भक्तनिवास विभाग/का.वि./०१/२०२६

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे भक्त निवास विभागासाठी पेस्ट कंट्रोल कामाचे दरपत्रक सिलबंद लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर संचलीत श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांत भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमधील खोल्या, गॅलरी, स्टोअर (भुभाग, छत, भिंती, ड्रेनेज, गटार व चेंबर्स) त्यातील फर्निचर, संडास, बाथरूम, स्नानगृह, गाद्या, कॉट, बेड व इ. मध्ये भक्तांना ढेकूण, झुरळे, पाल, पिसा, मुंगी, उंदीर, घुस, सर्प व व इतर किटकांचा त्रास होऊ नये म्हणून किटकनाशक औषधे फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेकामी तसेच भक्तनिवास येथील ३६१ खोल्यांमधील व इमारतीमधील सर्व लाकडी साहित्यास वाळवीचा समुळ नायनाट करणेकामी ड्रीलींग करून ऑईलबेस स्प्रे करून केमीकल भरणेबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहेत. या संबंधीच्या सुचना अटी व शर्ती खालील प्रमाणे.

१. सदर पेस्ट कंट्रोल व वाळवी फवारणी कामाचे माहितीचे बुकलेट कार्यालयीन वेळेत श्री संत तुकाराम भवन व श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे पहाणीसाठी उपलब्ध असेल. मंदिरे समितीच्या vitthalrukminimandir.org या पहावयास संकेतस्थळावर मिळेल.

२. दरपत्रक फॉर्म १ व फॉर्म २ श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे कार्यालयीन वेळेत भक्तनिवास येथे विक्रीकरीता दि.१६/०४/२०२६ रोजी पासुन सकाळी ११.०० पासुन उपलब्ध राहतील.

३. दरपत्रका सोबतचे सर्व कागदपत्रे स्वतंत्र लिफाफ्यात ई–१ (तांत्रीक लिफाफा) व ई–२ (वाणिज्यक/व्यापारी लिफाफा) असे दोन स्वतंत्र लिफाफे सिलबंद करून दि. २८/०४/२०२६ सांय ०५:०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

४. ई–१ (तांत्रीक लिफाफा) व ई–२ (वाणिज्यक/व्यापारी लिफाफा) लिफाफ्यावर ठेकेदाराचे नांव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक पेस्ट कंट्रोल करणेकामी व वाळवी प्रतिबंधात्मक फवारणी करीता भरलेले आहे, असा सविस्तर तपशील नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. दि. २८/०४/२०२६ सांय ०५:०० नंतर आलेले दरपत्रक विचार घेतले जाणार नाहीत.

५. पेस्ट कंट्रोल व वाळवी प्रतिबंधक विशेष फवारणी कामी दरपत्रकाचा स्वतंत्र फॉर्म देण्यात आलेला आहे. सदरचे दोन्ही फॉर्म ई–२ (वाणिज्यक/व्यापारी लिफाफा) सिलबंद लिफाफ्यात भरावयाची आहे.

६. पुर्ण माहिती भरलेली दरपत्रके मुदतीत सादर करावयाची जबाबदारी दरपत्रकधारकावर आहे.

७. दरपत्रकधारकाने दरपत्रक फि २,३६०/–(अक्षरी रूपये:– दोन हजार तीनशे साठ रु. मात्र) व बयाणा रक्कम १०,०००/– (दहा हजार रु. मात्र) मंदिरे समितीच्या इकडील कार्यालयाकडे रोखीने जमा करावी.

८. तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रे अपूर्ण असतील किंवा त्यामध्ये अपात्र असल्यास सदर निविदाधारकांचे ई–२ (वाणिज्यक/व्यापारी लिफाफा) विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९. दरपत्रक फॉर्म फी व बयाणा रक्कम मंदिर समितीचे कार्यालयात जमा केल्या शिवाय सादर केलेले दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाहीत व उघडले जाणार नाही.

१०. यशस्वी दरपत्रकधारकास दरपत्रक स्विकृती पत्र मिळाले पासून ०८ दिवसात सुरक्षा ठेव व करारनामा करून द्यावा लागेल व कामाची हमी म्हणून कार्यादेशाच्या मंजुर रकमेवर पेस्ट कंट्रोल कामाकरीता ०५ टक्के व वाळवी प्रतिबंधक विशेष फवारणी कामाकरीता १० टक्के प्रमाणे होणारी रक्कम समितीकडे सुरक्षा ठेव म्हणून बिनव्याजी निविदा कालावधी अखेर ठेवावी लागेल.

११. पेस्ट कंट्रोल औषध फवारणी केलेनंतर औषधाचा प्रभाव ६० दिवस असणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाची तपासणी महिन्यातून ०१ वेळा करणे आवश्यक आहे.

१२. वाळवी प्रतिबंधक फवारणी काम केलेनंतरचे औषधाचा प्रभाव किमान १ वर्षे असणे आवश्यक आहे. तसे न झालेचे आढळलेस त्याकामी जमा करण्यात आलेली सुरक्षा ठेव जप्त करणेत येईल.

१३. औषध फवारणी करतांना औषधांचा प्रभाव ढेकूण, झुरळे, पाल, पिसा, मुंगी, उंदीर, घुस, सर्प व अन्य किटकांवर परीणाम होणे आवश्यक आहे.

१४. वाळवीचा समुळ नायनाट करणेकामी ड्रीलींग करून ऑईलबेस स्प्रे करून केमीकल भरणे आवश्यक आहे व त्याचा वाळवी व इतर किटकांवर परीणाम होणे आवश्यक आहे.

१५. वाळवी प्रतिबंधक फवारणी काम करताना इमारतीचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता यशस्वी निविदाधारकांनी घ्याव्याची आहे.

१६. पेस्ट कंट्रोल काम करताना परिसरातील फवारणी करताना भक्तनिवास येथील परिसरात व तबक उद्यान येथे सरपटणारे प्राणी येणार नाहीत त्याकामीचे फवारणी किंवा औषधे भाविकांचे हताला न लागतील अशी ठेवणेचे आहेत. तसेच तबक उद्यान येथे फवारणी करताना तबक उद्यानातील झाडांना सदरचे औषधामुळे हानी होणार नाही याची दक्षता घेणेची आहे.

१७. पेस्ट कंट्रोल काम व्यवस्थीत झाले नाही असे आढळून आल्यास निविदाधारकास स्वखर्चाने पुनश्च तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करून द्यावी लागेल. त्यासाठी वेगळी रक्कम अदा केली हाणार नाही.

१८. पेस्ट कंट्रोल करण्याचा कालावधी श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या तिन्ही इमारतीमध्ये एक वर्षाचा राहील.

१९. निविदेच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

२०. दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करतांना सर्व करासहीत अंतिम दर देणे बंधनकारक आहे.

२१. दरपत्रकधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम केले नाही त्यामुळे इतरांकडून करून घेण्यात आलेल्या कामापोटी मंदिरे समितीचे झालेले नुकसान दरपत्रकधारकास द्यावे लागेल. त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाला ५००/– रुपये प्रमाणे वाढीव नुकसान मंदिरे समितीचे द्यावयाचे आहे. दंडाची रक्कम दरपत्रकधारकाच्या बीलातून परस्पर कपात करण्यात येईल.

२२. दरपत्रकधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधनकारक काम करत नसेल तर अथवा पेस्ट कंट्रोलचा काहीच परिणाम होत नाही असे आढळून आल्यास, मंदिरे समितीस कोणतीही पुर्व सुचना न देता करार रद्द करेल व दरपत्रकधारक यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येवून ०३ वर्षासाठी मंदिरे समितीच्या काळ्या यादीत नांव टाकण्यात येईल.

२३. न्युनतम दरानुसार मंजुर झालेल्या कामाबाबतचा कार्यादेश देण्यात येईल, त्यानुसार काम करावे लागेल. दिलेले काम वेळेत न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२४. दरपत्रकधारकांने दरपत्रक सादर करतांना काही माहिती अपुरी ठेवल्यास/राहिल्यास त्या दरपत्रक कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील, अंतिम निर्णय मा. कार्यकारी अधिकारी यांचेसाठी राखीव असेल.

२५. नमुद केलेल्या इमारतीमध्ये एक वर्ष कालावधी करीता पेस्ट कंट्रोल करणे आहे. पेस्ट कंट्रोल व्यवस्थीत झाले नाही असे आढळून आल्यास दरपत्रकधारकास स्वखर्चाने पुनःश्च तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करून दयावी लागेल. त्यासाठी वेगळी रक्कम अदा केली जाणार नाही.

२६. यशस्वी दरपत्रकधारकास पेस्ट कंट्रोल करण्यापुर्वी संबंधित विभागाकडून कळविण्यात येईल. त्यानुसार खोल्या व परिसरामध्ये औषध फवारणी वेळेत करून द्यावी लागेल जर काम वेळेत झाले नाही तर होणारे नुकसानीची भरपाई समिती ठरवेल त्यानुसार देणे बंधनकारक राहील..

२७. औषध फवारणीसाठी लागणारे कामगार, औषध, पंप, साहित्य दरपत्रकधारकाने स्वखर्चाने पुरवावयाचे आहेत.

२८. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे जाणे/येण्याचा खर्च तसेच चहा /पाणी /जेवण /नाश्ता व राहण्याची वगैरे खर्च दरपत्रकधारकाने स्वत: करावयाचा आहे. `

२९. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची विषबाधा अगर इतर कारणास्तव काही त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रकधारकावर राहील. मंदिरे समितीवर कुठल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

३०. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे वेतन/भविष्य निर्वाहनिधी/व्यवसायकर/आयकर/सेवाकर व ऐनवेळी उदभवणाऱ्या इतर सर्व कायदेषीर बाबींची जबाबदारी दरपत्रकधारकांवर राहिल. त्यास कोणत्याही प्रकारे मंदिरे समिती जबाबदार राहणार नाही.

३१. दरपत्रकधारकाची दरपत्रक मंजुर झालेनंतर त्यांनी सदर कामासाठी घेतलेल्या कामगारांचे भविष्य निर्वाह निधी अंशदान कामगार कल्याण निधी, इ. एस.आय.सी. कॉंट्रीब्युशन, गृप इन्शुरन्स, वर्क मेन कॉम्पेसेशनपॉलीसी, व्यवसाय कर, टी.डी.एस. सानुग्रह अनुदान, पगारी आठवडा सुट्टी, जी.एस.टी. कामगार कायद्यानुसार वेतन स्लीप व इतर आर्थिक देणी देणेबाबतची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील मंदिरे समिती त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोशिष व झळ मंदिरे समितीला लागणार नाही हे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील.

३२. दरपत्रकधारकास प्रत्येक औषध फरवाणीचे वेळी अधिकारी सांगतील त्या विभाग प्रमुख/कर्मचारी यांचे समक्ष औषध फवारणी करून दयावी लागेल.

३३. पेस्ट कंट्रोल करणेकामी देण्यात आलेल्या चौ.फु. दरामध्ये खोल्या, छत, भुभाग, चार भिंती त्यातील फर्निचर, संडास बाथरूम, गाद्या, कॉट, क्लॉकरूम, हॉल, गॅलरी, साईड गटार, चेंबर्स इ. चा समावेश राहील. बील हे चटाई क्षेत्राचे मोजमापा प्रमाणे अदा केले जाईल.

३४. कार्यादेशात इमारती व्यतिरीक्त पेस्ट कंट्रोल करावयाच्या इमारतीमध्ये वाढ झाल्यास, वाढीव इमारतीचे आकारमानानुसार प्रति चौरस फुटास मंजुर दराने व त्याच दराने वाढीव इमारतीमध्ये या करार कालावधीत पेस्ट कंट्रोल करून देणे दरपत्रकधारकांवर बंधनकारक राहील. त्यासाठीचे अटी व शर्ती आहे त्याच राहतील ज्या वाढीव इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल कामाबाबत दरपत्रकधारकास स्वतंत्र पत्र देऊन कळविण्यात येईल.

३५.एका वर्षामध्ये कालावधीमध्ये प्रति दोन महिन्यानंतर एक फवारणी अशा कमीतकमी सहा फवारण्या करणे आवश्यक आहे. अशा केलेल्या प्रत्येक फवारणी नंतर झालेल्या कामाचे मंजुर दराने होणाऱ्या रक्कमे इतके बिल दरपत्रकधारकाने संबंधित विभागाकडे सादर करावे.

३६.एक वर्ष करार कालावधीत कोणत्याही कारणांसाठी अथवा सबबीवर दरपत्रकधारकास दरवाढ मिळणार नाही. निश्चित केलेल्या दरानेच पेस्ट कंट्रोल काम करावे लागेल.

३७. नियुक्त केलेल्या कामगाराचे संबंधित कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲण्ड ॲबॅलिशन) ॲक्ट 1970 नुसार हजेरी रजिस्टर वेतन पत्रके, वगैरे अनुषंगिक कागदपत्रे विहित नमुन्यात ठेवणे तसेच सदरच्या कायद्यानुसार त्यांची पुर्तता करणे ही संपुर्ण जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

३८.दरपत्रकधारकांकडून नियुक्त केलेल्या कामगारानी भाविक भक्तांशी, नागरिकाशी, मंदिरे समितीचे अधिकारी/कर्मचारी यांच्याशी गैरवर्तन करणार नाही. याची काळजी दरपत्रकधारकाने घ्यावयाची आहे.

३९. इमारतीच्या सभोवतालच्या परिसरात ड्रेनेज/चेंबर्स या ठिकाणी औषध फवारणी करावी लागेल.

४०. दरपत्रकधारकास पेस्ट कंट्रोल करतांना मधमाश्यांचे मोहोळ आढळून आल्यास ते काढावे लागेल.

४१.कर्मचाऱ्यांना आपले कंपनीचे गणवेष व सुरक्षते बाबतचे साहित्य दयावे लागतील.

४२. पेस्ट कंट्रोल करणेकामी Central Insecticide Boards ने approve केलेले (house hold) (Aimco Pesticided Ltd, Bayer Crop Science Ltd, Bharat Rasayan Ltd Aimco Pesticided Ltd, Bayer Crop Science Ltd, Bharat Rasayan Ltd) औषध वापरणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील.

४३. दरपत्रकधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रक्कम रू ६००/– स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करून दयावे लागेल व त्यास येणारा खर्च दरपत्रकधारकाने स्वत: करावयाचा आहे.

४४. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास दरपत्रकधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम मंदिरे समितीकडे जमा राहील. मंदिरे समितीचे झालेली नुकसानीची, नुकसान भरपाई दरपत्रकधारकांकडून वसुल करण्यात येईल.

४५. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी व शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी व शर्ती विहित करणे याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.

४६. दरपत्रक सादर करण्यापुर्वी ज्या दरपत्रकधारकांना कामाची माहिती घ्यावयाची असेल अशा दरपत्रकधारकांनी दरपत्रक टेंडर सादर करण्यापुर्वी मंदिरे समिती चे श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमध्ये समक्ष जाऊन/कामाची पाहणी व सखोल अभ्यास करून माहिती घेवून सर्व करासह अंतिम दर दयावेत.

४७. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल.

४८. कोणतेही कारण न देता निविदेच्या कोणत्याही टप्यावर दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवला आहे.

४९. कमी जास्त दराची कोणतीही दरपत्रक स्वीकारण्याचा नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिरे समितीकडे बंधनकारक राहणार नाही.

५०. पेस्ट कंट्रोल केल्यानंतर भाविकांना व भक्तनिवास मधील अधिकारी, कर्मचारी व कामगारांना कोणत्याही प्रकारचा त्रास उदा. विष बाधा, मळमळने उलटी होणे व वास येणे इ. होता कामा नये अशा प्रकारचा त्रास झाल्यास याची सर्व जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

५१. पेस्ट कंट्रोल कामाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो क्षेत्र पंढरपूर या कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

५२. दरपत्रकधारकास खालील निवास स्थानांमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करावयाचे आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | खोल्यांची संख्या | एकुण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) |
|---|---|---|---|
| १ | श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास | २९७ | ९३६३३ चौरस फुट |
| २ | वेदांत भक्तनिवास | ३० | ९६०८ चौरस फुट |
| ३ | व्हिडिओकॉन भक्तनिवास | ३४ | ११०८२ चौरस फुट |
| | एकुण | | ११४३२३ चौरस फुट |

५३. दरपत्रका सोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रांची यादी खालील प्रमाणे आहे. सदरचे सर्व कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा. या आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रृटी असल्यास किंवा कागदपत्रे सादर न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

| अ.क्र | तांत्रीक लिफाफ्यातील पेस्ट कंट्रोल कामासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी |
|---|---|
| १ | फॉर्म फि (विना परवाना) जमा केलेली पावती |
| २ | बयाना रक्कम (परतावा) जमा केलेली पावती किंवा डी.डी. कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नांवे. |
| ३ | परिशिष्ट – १ प्रमाणे पेस्ट कंट्रोल कामाचा तपशील. |
| ४ | परिशिष्ट – २ प्रमाणे दरपत्रकधारकाची माहिती. |
| ५ | परिशिष्ट – ३ प्रमाणे प्रतिज्ञापत्र |
| ६ | आय.एस.ओ. (ISO) मानांकन प्रमाणपत्र Licensing Authority चे प्रमाणपत्र |
| ७ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला |
| ८ | पॅन कार्ड |
| ९ | आधार कार्ड |
| १० | जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन जी एस टी क्रमांक पावती |
| ११ | शासकीय/निमशासकीय/पंचताराकिंत हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेश. |
| १२ | पेस्ट कंट्रोल कामाचा ०३ वर्षांचा अनुभव असावा व त्यासंदर्भतील आवश्यक पुरावे. |
| १३ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटर ट्रेनिंगचे प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| a) | Central Food Technological Resarch Institute अथवा |
| b) | Technical Training For PMP s अथवा |
| c) | storage pest Management & Fumigation |
| १३ | (भारतीय अनाज संचयन संस्थान चे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र) अथवा |
| a) | The pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र |
| १४ | आपल्या फर्मचे नांव ब्लॅक लिस्टेड नसले/असेल बाबतचे हमीपत्र लेटर हेडवर सही शिक्क्यानिशी सादर करावे. (Self Declaration) |

परिशिष्ट क्रमांक १

फॉर्म – १

पेस्ट कंट्रोल दरपत्रक तक्ता (किटकनाशक औषध फवारणी)

कालावधी २०२६ – २०२७

दिनांक ०१/०५/२०२६ ते दिनांक ३०/०४/२०२७

दरपत्रकधारकाने श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमध्ये खोल्या/स्टोअर (भुभाग, छत व भिंती) त्यातील फर्निचर, संडास, बाथरूम, गादया, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकूण,झुरळे,पाल,पिसा,मुंगी,उंदीर,घुस,सर्प तसेच इ. किटकांचा त्रास होऊ नये म्हणून पेस्ट कंट्रोल करणेकामी एक वर्षाकरीता (०६ फवारण्या) प्रति चौरस फुटाचा दर दयावा. इमारतींचे डग, ड्रेनेज, गॅलरी, पॅसेज इत्यादीचा समावेश त्यात राहील.

| अ.क्र. | तपशिल | पेस्ट कंट्रोल करणेचे तीनही भक्तनिवासातील एकुण क्षेत्रफळ | जनरल पेस्ट कंट्रोल एकुण फवारणीचा सर्व करासह दर (एक फवारणी) रुपये पैसे | जनरल पेस्ट कंट्रोल एकुण फवारणीचा सर्व करासह दर (सहा फवारणी) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास खोल्या–२९७ ९३६३३ चौ.फुट | १,१४,३२३ चौ.फुट | | |
| २ | वेदांत भक्तनिवास खोल्या–३० ९६०८ चौ.फुट | | | |
| ३ | व्हिडिओकॉन भक्तनिवास खोल्या–३४ ११०८२ चौ.फुट | | | |

दरपत्रकधारकाचे पुर्ण नांव – दरपत्रकधारकाची स्वाक्षरी

शिक्का व संपुर्ण पत्ता –

मोबाईल नंबर –

परिशिष्ट क्रमांक १/अ

## फॉर्म – २

## वाळवी फवारणी दरपत्रक तक्ता (वाळवी समूळ नायनाट करणे)

## कालावधी २०२६ – २०२७

## दिनांक ०१/०५/२०२६ ते दिनांक ३०/०४/२०२७

दरपत्रकधारकाने श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमध्ये असणारे सर्व लाकडी साहित्यास वाळवीचा समुळ नायनाट करणेकामी ड्रीलींग करून ऑईलबेस स्प्रे करून केमीकल भरणेबाबत वर्षातून ०१ वेळेसचा दर दयावा.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>वाळवी फवारणी करणेचे तीन्ही भक्तनिवास व परिसरातील फर्नीचर</th><th>वाळवी प्रतिबंधात्मक फवारणीचा<br>सर्व करासह दर<br>(एक फवारणी)<br>रुपये पैसे</th></tr>
<tr><td>१</td><td>श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास<br>खोल्या–२९७</td><td rowspan="3">सर्व इमारतीमधील सर्व लाकडी साहीत्याचे ठिकाणी. सदर फवारणी किमान १ वर्षे परिणाम कारक असणे बंधनकारक आहे.</td><td rowspan="3"></td></tr>
<tr><td>२</td><td>वेदांत भक्तनिवास<br>खोल्या–३०</td></tr>
<tr><td>३</td><td>व्हिडिओकॉन भक्तनिवास<br>खोल्या–३४</td></tr>
</table>

दरपत्रकधारकाचे पुर्ण नांव –

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी

शिक्का व संपुर्ण पत्ता –

मोबाईल नंबर –

परिशिष्ट क्रमांक २

## दरपत्रक धारकाची माहिती

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | फर्मचे नांव : | |
| | पत्र व्यवहारासाठी संपूर्ण पत्ता : | |
| | दुरध्वनी क्रमांक : | |
| | ई मेल : | |
| | व्हॉट्सऍप क्रमांक : | |
| | निविदेसंबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तिचे नाव : | |
| | मोबाईल क्रमांक : | |
| | बँक तपशील ( रद्द केलेल्या धनादेशाची छायांकीत प्रत सोबत जोडावी) | |

दरपत्रकधारकाची सही

परिशिष्ट क्रमांक ३

रक्कम रू ६००/– चे स्टँप पेपरवर

**प्रतिज्ञापत्र**

मा. कार्यकारी अधिकारी

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर. ४१३३०४

**विषय:– भक्तनिवास येथील पेस्ट कंट्रोल कामाबाबत.**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेले दरपत्रक/दरपत्रक वाचली आपल्या दरपत्रक निविदेत नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी व शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले मंदिरे समितीचे श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीच्या खोल्या/स्टोअर किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) करावयाचे आहे. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य/मशीनरी व उच्चतम दर्जाचे औषधे स्वतःच्या खर्चाने वापरावयाचे आहे. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारणेची हमी देतो. त्यासाठी लागणाऱ्या मशीनरी व कामगार यांची राहण्याची/जेवण/चहापानाची व्यवस्था मी/आम्ही आमचे खर्चाने करू, कामगारांचे वेतन/भविष्य निर्वाह निधी/व्यवसाय कर/सेवाकर/आयकर वगैरे सर्व कायदेशीर जबाबदारी व त्याबाबत लागणाऱ्या पुर्ततेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर/आम्हावर राहील, याची हमी देते आहे/आहोत.

सदर पत्राद्वारे हमी देतो की, आम्हाला/आमच्या मंदिरे समिती पेस्ट कंट्रोल कामी कुठल्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्थान अथवा खाजगी संस्थान यांनी काळ्या यादीत (black listed) समाविष्ट नाही. सदर माहिती खरी व बरोबर असून ती चुकीची आढळल्यास आमची दरपत्रक रद्द होणेस पात्र राहील. दरपत्रक फि भरलेची पावती सोबत जोडत आहोत तसेच बयाना रक्कमेची पावती/डी.डी. जोडला आहे.

माझी/आमची दरपत्रक मंजुर झाल्यास सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा ०८ दिवसार करून देणेस तयार आहे/आहोत त्यास नियमानुसार येणारा खर्च मी करेल/आम्ही करू उपरोक्त कामाची हमी म्हणून मंजुर झालेल्या रकमेच्या ५ टक्के व वाळवी प्रतिबंधक फवारणी करीता १०% इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रोख/RTGS/NEFT ने द्वारे भरणा करू, निविदेतील मंजुर दराने काम करून देणे/आम्हावर बंधनकारक राहील.

दरपत्रकधारकाची सही — आपला/आपले विश्वासु

दरपत्रक धारकाचे नांव ------------------ — शिक्का

संपुर्ण पत्ता ------------------

फोन/मोबाईल नंबर ------------------